<u>निशाणी क्र.०१ वरील आदेश</u>

अर्जदार क्र.१ माधुरी ज्ञानेश्वर मोरे, क्र.२ वेदिका ज्ञानेश्वर मोरे व क्र.३ अनुराग ज्ञानेश्वर मोरे यांनी सदरचा अर्ज ते मयत ज्ञानेश्वर खुशालराव मोरे यांचे वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र.१ ही मयत ज्ञानेश्वर खुशालराव मोरे यांची पत्नी तर अर्जदार क्र.२ वेदिका हि मुलगी व क्र. ३ अनुराग हा मुलगा आहे.

३. मयत ज्ञानेश्वर खुशालराव मोरे यांचा मृत्यु दिनांक १९/१०/२०२४ रोजी झालेला आहे. मयत ज्ञानेश्वर खुशालराव मोरे यांचे वारस दाखल्याची अर्जदारांना शासकिय व निमशासकिय/खासगी कामकाजाकरीता आवश्यकता लागणार आहे. सबब त्यांचे पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस असल्याचा दाखला मिळण्यासाठी त्यांनी प्रस्तूतचा अर्ज केला आहे.

४. अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.०९ कडे, मयत ज्ञानेश्वर खुशालराव मोरे यांच्या मृत्यू दाखल्याची साक्षांकीत प्रत नि.१० कडे, अर्जदारांच्या ओळखपत्रांच्या साक्षांकित प्रती नि. ११ ते १३ कडे दाखल केलेल्या आहेत. अर्जदारांच्या नावे वारस दाखला देण्यास कुणाची हरकत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी स्थानिक वृत्तपत्र ”विदर्भ मतदार“ मध्ये दि. २३/०६/२०२६ रोजी नोटीस प्रसिध्द करण्यात आली. ती निशाणी १४ कडे आहे, तसेच जाहीरनामा नि.०६ प्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेला आहे. परंतु मुदतीत अर्जदारांच्या नावे वारस दाखला देण्यास कोणीही हरकत घेतली नसल्याचे दिसून आले.

५. अर्जदारांचा अर्ज, त्यांचे मयताशी असलेले नाते संबंध, तसेच

त्यांनी दाखल केलेले कागदोपत्री पुरावे व शपथपत्र, विचारात घेऊन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आ दे श

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र.१ माधुरी ज्ञानेश्वर मोरे, क्र.२ वेदिका ज्ञानेश्वर मोरे व क्र.३ अनुराग ज्ञानेश्वर मोरे हे मयत ज्ञानेश्वर खुशालराव मोरे यांचे वारस असल्याचा दाखला योग्य ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर त्यांना देण्यात यावा.

३) अर्जदारांनी ज्या कारणासाठी दाखला मागितलेला आहे केवळ त्याच कारणासाठी त्याचा उपयोग करता येईल. वारस दाखल्यान्वये कोणत्याही मिळकतीचा मालकी हक्क ठरवून मिळत नाहीत.

४) सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधिन राहून देण्यात येत आहे.

स्वा/–

**(रोशनी दिपक चौबे)**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर

ठिकाण: आर्णी

दिनांक: ०७/०८/२०२६